*<u>संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक २६७/२०२१</u>*

*<u>निशाण ११</u>*

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार नं.०१**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

**माझे नावः पद्मेश रामचंद्र महाडीक,**

वय - ५० वर्षे, व्यवसाय -खाजगी नोकरी,

रा. राजू शेटये चाळ लांजा, ता. लांजा जि.रत्नागिरी.

**सरतपास अभियोग पक्षातर्फे विशेष सहायक सरकारी अभियोक्ता**

**श्रीम. पी. जे. पवार यांचे मार्फत**

१. मला पोलिसांनी पंचनाम्यासाठी बोलविले नव्हते. पोलिसांनी मला एका कागदावर सही करण्यास सांगितली व मी सही केली. आता मला दि. ११/१०/२०२१ रोजीचा पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर अनुक्रमांक १ येथे माझी सही असून त्या सहीस **निशाण अ–१/अ.सा. १** देणेत येत आहे.

**(सरकारी वकीलांनी केलेल्या विनंती नुसार पुराव्याचे कायदयाचे कलम १५४ अन्वये सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी आणी फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम १६२ (१) नुसार पुराव्याच्या कायद्यातील कलम १४५ मधील पद्ध्तीने साक्षीदाराची विधाने खंडण करणेची अनुमती मागीतली अनुमती देणेत येते.)**

२. हे म्हणणे खरे नाही की, मला व दुसरे पंच अमित रामाणे यांना लांजा बाजारपेठ येथे पोलिसांनी बोलविले. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी कुकूटपालन लांजा येथे चोरटा जुगार खेळ खेळत व खेळवित असताना मिळून आला. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीच्या ताब्यात कल्याण मटका जुगाराचे साहित्य मिळून आले. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव हरिश्चंद्र रामचंद्र इंगळे, रा– लांजा कुक्कूटपालनजवळ ता. लांजा, जि. रत्नागिरी असे सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीच्या ताब्यात एक गुलाबी व सफेद कागद असलेले पिना मारून तयार केलेले पावती पुस्तक त्यावर मुंबई असे प्रिंट असलेले खोडून पेनाने कल्याण असे लिहिलेले असून त्याला क्र. २०१ ते ४०० असे प्रिंटेड नंबर आहेत त्यातील तीन पानावर कल्याण मटका जुगाराचे अंक व त्याखाली पैसे लिहिलेले आहेत व सदर पावती पुस्तकात फाडलेला निळा कार्बन पेपर, एक प्लॅस्टीकचे निळया शाईचे साधे बॉलपेन व रोख रक्कम रू. ७४०/– असा मुद्देमाल मिळून आला. हे म्हणणे खरे नाही की, पंचासमक्ष सर्व मुद्देमाल जागीच जप्त करण्यात आला. हे म्हणणे खरे नाही की, सर्व मुद्देमाल प्लॅस्टीक पिशवीत वेगवेगळा भरून त्यावर आम्हा पंचाच्या व पोलिसांच्या सहयाची लेबले चिकटवून मुद्देमाल जागीच सिल केला. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या समक्ष पंचनामा करण्यात आला.

३. माझे इयत्ता १२ वी इतके शिक्षण झालेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी सही

करण्यापूर्वी कागद वाचल्याखेरीज सही करीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी माझ्या परिचयाचा आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीचे माझे संबंध चांगले असल्यामुळे मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. एम. एम. बंडबे यांनी नाकारला. सबब उलटतपास नाही.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृत.**

**समक्ष**

PRATHAMESH RAMESH BHOSALE
Digitally signed by PRATHAMESH RAMESH BHOSALE
Date: 2024.03.20 19:31:11 +0530

**दिनांक २०/०३/२०२४** **(प्र.र.भोसले)**

**ठिकाण लांजा.** **प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी, लांजा,**

**जि.रत्नागिरी**